# लेखणी

लेखणी म्हणजे शस्त्रच जणु! कोणीतरी म्हणायचं,
न झोपणाऱ्या जगाला आता जागं कसं करायचं?
'लेखणी'ला सर्च केलं, वेबसाईट मिळेना
पण 'लेखणी म्हणजे शस्त्र!' मन काही मानेना.

लेखणी म्हणजे 'मोरपीस............!'
मनावर अलवार फिरणारं!
इतकं इतकं हळवं....... आसवांनी गाल भिजवणारं!
इतकं इतकं हलकं....... मन हलकं हलकं करणारं!
सोबत नसता कुणाचीही, वाऱ्यावर मनसोक्त डोलणारं!
श्यामनिळ्याच्या शोधात घनव्याकूळ झुरणारं!

लेखणी म्हणजे 'पिंपळपान.............!'
दिवसेंदिवस गड्ड्यात काढूनही जाळीदार वीण गुंफणारं!
सुरळी वळली कुणी की लगेचच शीळ घालणारं!
जरा कुठे ओल जाणवली की आपोआप अंकुरणारं!
आकाशाकडे एकटक बघत चाळकड्ड्यावरही बहरणारं!

लेखणी म्हणजे 'अंतर.............!'
कपाळाच्या आठीवरून हसऱ्या ओठांवर विसावणारं!
गुलाबाच्या पाकळीपासून काट्यापर्यंतच मावणारं!
रूतल्या काट्याच्या सलगीतही तुला शोधत फिरणारं
तुझ्यामाझ्यासारखं! परस्परांकडे धावणारं.............

*: जिगीषा*